## भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र
(दुपार)

जा.क्र. ४७६/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक २९/०६/२०१७

**१) संगनमत करुन बिना नंबरचे ट्रॅक्टर ट्रॉली मध्ये बिना पासपरवाना रेतीची चोरी करतांनी मिळुन आल्याने गुन्हा नोंद .:–**

दिनांक २८/०६/२०१७ चे ११.०० वा. दर. यातील फिर्यादी हे भंडारा बंद असल्याने बंदोबस्ता दरम्यान पोनी. कंकाळे व स्टॉपसह फस्ट मोबाईलने पेट्रोलींग करीत असता यातील आरोपीतांनी संगनमत करुन बिना परवाना बिना नंबरचे ट्रॅक्टर टॉली मध्ये ०१ ब्रास रेती किंमती १,०००/–रु. ची अवैद्यरित्या चोरीने वाहतुक करतांनी मिळुन आल्याने सरतर्फे फिर्यादी पो. शि. आशिष बडवाईक पोस्टे भंडारा यांचे रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम ३७९,३४ भांदवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सफौ. महालगावे पो.स्टे. भंडारा हे करीत आहेत.

**२) संगनमत करुन घराची भिंत जेसीपीने गायीचे अंगावर पाडुन गायीचे दोन्ही पाय विकलांग करुन तसेच लोखंडी गेटचे नुकसान केल्याने गुन्हा नोंद .:–**

दिनांक २७/०६/२०१७ चे १०.०० वा. दर. यातील फिर्यादी सुनील महादेव वाघाये वय ५२ वर्ष, रा. केसलवाडा यांची घरची गाय अंगणात खुंटाला बांधली असता आरोपी क्र. २ ने आरोपी क्र. १ ची घराची भिंत जेसीपीने पाढीत असता फिर्यादीला कोणतीही सुचना न देता भिंत पाळुन गायीचे अंगावर भिंत पडल्याने गायीचे दोन्ही पाय मोडुन विकंलाग करुन निरुपयोगी करुन तसेच लोखंडी गेटचे नुकसान केल्याने फिर्यादी यांचे लेखी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन लाखनी येथे कलम ४२७,४२९,३४ भांदवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सफौ. संतापे पो.स्टे. लाखनी हे करीत आहेत.

**३) सार्वजनिक ठिकाणी दारूच्या नशेत वाहन चालवितांनी मिळुन आल्याने गुन्हा नोंद . :–**

दिनांक २८/०६/२०१७ चे १६.०० वा. दरम्यान यातील आरोपी चालकाने आपले ताब्यातील मोटार सायकल दारू पिऊन दारूचे नशेत नागझिरा फाटा साकोली मिळुन आल्याने त्याची वैधकीय तपासनी केली असता दारू पिऊन दारूचे नशेत असल्याचा अभिप्राय मिळुन आल्याने सरतर्फे फिर्यादी पोना. रामटेके यांचे रिपोर्ट वरुन पोस्टे साकोली येथे कलम १८५,५० (१)/१७ मोवाका. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोना. रामटेके पो. स्टे. साकोली हे करीत आहेत.

**४) तिसरे माळयावरुन खाली पडुन डोक्याला मार लागुन इसमाचा मृत्यु . :–**

दिनांक २८/०६/२०१७ चे १९.०० वा. दर. यातील मृतक अमृत किसन कुथे वय ६९ वर्ष, रा. तकीया वार्ड भंडारा हा तिसरे माळयावरुन खाली पडुन डोक्याला मार लागुन त्यास औषधोपचारा करीता सा. रु. भंडरा येथे नेले असता तेथील डॉक्टरांनी तपासुन मृत घोषीत केल्याने सरतर्फे फिर्यादी पो. शि. मारबते यांचे रिपोर्ट व डॉक्टरी मेमो वरुन पोस्टे भंडारा येथे कलम १७४ जाफौ. अन्वये मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास सफौ. कन्नाके पोलीस स्टेशन भंडारा हे करीत आहेत.

**५) मिरगीच्या त्रासाला कंटाळुन विहीरीचे पाण्यात बुडुन इसमाचा मृत्यु . :–**

दिनांक २७/०६/२०१७ चे १९.०० वा. दर. यातील मृतक देवचंद मोतीराम शहारे वय ३५ वर्ष, रा. केसलवाडा/ पवार हा मिरगीच्या बिमारीला कंटाळुन विहीरीत कुदुन विहीरीचे पाण्यात बुडुन मरण पावल्याने फिर्यादी आसाराम हेमराज कोचे वय ४९ वर्ष, रा. भुगाव/पंढरपुर पोस्टे पालांदुर यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोस्टे लाखनी येथे कलम १७४ जाफौ. अन्वये मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास सफौ. ऊके पोलीस स्टेशन लाखनी हे करीत आहेत.

**६) प्रकृती खराब असल्याने औषधोपचारा दरम्यान गर्भवती महिलेचा मृत्यु . :–**

दिनांक ०४/०६/२०१७ चे २३.०० वा. दर. यातील मृतक सौ. ज्योती विनोद गायकवाड वय ३० वर्ष, रा. नेरला ही ९ महिण्याची गर्भवती होती दिनांक ०४/०६/२०१७ चे २३.०० वा. दर. तिचे पोटात दुखत असल्याने व प्रकृती खराब असल्याने तिला औषधोपचारा करीता ग्रा. रु. अडयाळ येथे प्रथम उपचारा करुन नंतर सा.रु. भंडारा येथे उपचार करुन नंतर मेडीकल कॉलेज नागपुर येथे अपघात विभाग रजीस्टर नं. १५+३८०५ वर डॉक्टर सीएएम व डॉक्टर नरेश कुमार यांना दाखविले असता त्यांनी तपासुन दिनांक ०५/०६/२०१७ चे १०.३५ वा. मृत घोषीत केल्याने पोस्टे अजनी नागपुर येथे मर्ग क्र. ००/१७ कलम १७४ जाफौ. चे कागदपत्र प्राप्त झाल्याने सरतर्फे फिर्यादी पोना. घरडे यांचे रिपोर्ट वरुन पोस्टे अडयाळ येथे कलम १७४ जाफौ. अन्वये नंबरी मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास पोहवा. सतदेवे पोलीस स्टेशन अडयाळ हे करीत आहेत.

**७) नदीचे पाण्यात बुडुन तरुणाचा मृत्यु . :–**

दिनांक २७/०६/२०१७ चे १६.०० वा. दर. यातील मृतक विकांत उर्फ विक्की राजेश्वर शेंडे वय २८ वर्ष रा. कोंडी हा आपले मित्रासह खैरी नदीचे घाटावर आंघोळीस गेले असता पाण्यात बुडल्याने त्यास औषधोपचार करीता सामान्य रुग्णालय भंडारा येथे आकस्मीक विभागात नेले असता डॉक्टरने तपासुन मृत घोषीत केल्याने पोस्टे भंडारा येथे मर्ग क्र. ००/१७ कलम १७४ जाफौ. प्राप्त कागदपत्रावरुन सरतर्फे फिर्यादी पोना. गोमासे यांचे रिपोर्ट वरुन पोस्टे मोहाडी येथे कलम १७४ जाफौ. अन्वये नंबरी मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास सफौ. केवट पोलीस स्टेशन मोहाडी हे करीत आहेत.

**८) मोटार वाहन कायदयाखाली कारवाई. :–**

दिनांक २८/०६/२०१७ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी मोटार वाहन कायदयाखाली एकुण १२० प्रकरणांची नोंद करण्यात आलेली असून अवैध प्रवासी ०२ तीन सिटर वाहनांवरती २१ केसेस व तसेच ईतर वाहनांवरती ९७ केसेस करण्यात आलेल्या आहेत.

सपोनी. अे.टी. सुनगार
नियंत्रण कक्ष भंडारा
दुरध्वनी.क्र ९८२३१२३३३६

प्रति,

**जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा**

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.